0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.०१/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/जा.११५, दि.०३/०३/२०१२ व १२/०३/२०१२.
३) मे. एकता वेअरहाऊसिंगचे मालक यांचे दि. ०७/०३/२०१२ रोजीचे निवेदन.
४) मे. राजीवा एक्सोर्टस यांचे दि. ०७/०३/२०१२ रोजीचे निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रे.
५) मे. सत्यनारायण पल्स मिल, मे. पी.ई.सी. लिमिटेड, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. व मे. कारगील इंडीया प्रा.लि. यांचे दि. २०/०३/२०१२ रोजीचे स्वतंत्र निवेदने व त्यासोबतचे कागदपत्रे.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/जा. २४८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १९/०४/२०१२.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २७/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना खात्रीलायक बातमी मिळाली की, शीळ पनवेल मार्गावरील पिंपरी पाडा येथील एकता इंडस्ट्रीयल युनिट या नमुद पत्यावर कडधान्याचा विनापरवाना साठा करुन व्यवसाय केला जात असल्याचे मिळालेल्या बातमीची खातरजमा करण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, हे पथक व पंचासमवेत एकता इंडस्ट्रीयल युनिट, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई या ठिकाणी नमूद गोदामावर येऊन पोहोचले. सदर जागेत प्रवेश केल्यावर उजव्या बाजूच्या एका गोदामात एक इसम काम करीत असल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी सदर इसमास त्यांची ओळख करुन देऊन भेटीचे प्रयोजन तसेच सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव दिपक शिवाजी देसाई असल्याचे सांगून तो या ठिकाणी व्यवस्थापकाचे काम करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्याने गोदामाची पाहणी केली असता त्यामध्ये बऱ्याच मोठ्याप्रमाणात कडधान्याचा साठा आढळून आला. याबाबत अधिकाऱ्यांनी उपस्थित

इसम नामे दिपक शिवाजी देसाई याचेकडे विचारणा केली असता त्याने असे सांगितले की, सदरची जागा केतन पटेल यांच्या मालकीची असून सदर जागेतील गोदाम क्रमांक ३, ७ व ८ अशा तीन गोदामांमध्ये वेगवेगळ्या कंपन्यांचा कडधान्याचा साठा विक्री करण्याकरीता साठवणूक केलेला असून सदर साठ्याबाबत लोडींग-अनलोडींग सर्व्हीस प्रोवायडर म्हणून काम पाहत असल्याचे सांगितले. याबाबत गोदामाचे मालक केतन पटेल हे त्यास रुपये ७०००/- याप्रमाणे मासिक पगार देत असल्याचे सांगितले. सदर जागेत तिन गोदामांमध्ये एकुण १८,५३,४०० किलो म्हणजेच १८५३४ क्विंटल कडधान्याचा साठा अस्तीत्वात असल्याचे सांगितले. याबाबत पंचांसमक्ष अधिकाऱ्यांनी तिनही गोदामांमधील कडधान्याच्या साठयाबाबत विचारणा केली असता दिपक शिवाजी देसाई यांनी सादर केलेल्या यादीनुसार खालील प्रमाणे साठा असल्याचे सांगितले.

### गोदाम क्र. ३

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साठा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. राजीवा ट्रान्स्पोर्ट | तुर | २८५५० | २८५.५० |
| २ | मे. अदानी | तुर | १६८००० | १६८० |
| ३ | मे. सत्यनारायण पुल्स मिल | तुर | २००००० | २००० |
| ४ | मे. पी.ई.सी. लिमिटेड | मुग | ७२००० | ७२० |
| | एकुण कडधान्याचा साठा | | ४६८५५० | ४६८५.५ |

### गोदाम क्र. ७

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साठा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. डी. सी. एम. लिमिटेड | तुर | ७६५०० | ७६५ |
| २ | मे. सत्यनारायण पल्स मिल | तुर | २५०००० | २५०० |
| ३ | मे. पी.ई.सी. लिमिटेड | तुर | ४५४९०० | ४५४९ |
| | एकुण कडधान्याचा साठा | | ७८१४०० | ७८१४ |

### गोदाम क्र. ८

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साठा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. कारगील इंडीया प्रा.लि. | चणा | ३४४०० | ३४४ |
| २ | मे. पी.ई.सी. लिमिटेड | तुर | २८८००० | २८८० |
| ३ | मे. सत्यनारायण पल्स मिल | तुर | २२५००० | २२५० |
| ४ | मे. अदानी | उडीद | ५६०५० | ५६०.५० |
| | एकुण कडधान्याचा साठा | | ६०३४५० | ६०३४.५० |

0003

**गोदाम क्र ३, ७ व ८ मध्ये आढळलेला कडधान्याचा एकुण साठा**

| अ.क्र. | गोदाम | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं.) |
|---|---|---|---|
| १ | गोदाम क्र ३ | ४६८५५० | ४६८५.५ |
| २ | गोदाम क्र ७ | ७८१४०० | ७८१४ |
| ३ | गोदाम क्र ८ | ६०३४५० | ६०३४.५० |
| | एकुण साठा | १८५३४०० | १८५३४ |

वरील नमुद कडधान्याच्या साठयाबाबत दिपक शिवाजी देसाई यांचेकडे अधिक विचारणा केली असता नमुद गोदामातील साठवणुक केलेल्या साठयाबाबत त्यांचेकडे साठवणुकीकरीता कोणताही परवाना उपलब्ध नसल्याचे सांगितले तसेच त्याकरीता मुंबई/ठाणे शिधावाटप यंत्रणेकडे कोणताही अर्ज केला नसल्याचे सांगितले. याबाबतचा दिपक शिवाजी देसाई यांचा पंचांसमक्ष लेखी जबाब नोंदवून घेण्यात आलेला आहे.

सदरच्या तिनही गोदामांमध्ये आढळून आलेला एकुण १८५३४०० किलो म्हणजेच १८५३४ क्विंटल कडधान्याचा साठा असुन तो बऱ्याच मोठया प्रमाणात असल्याने तसेच संबंधितांकडे त्याबाबत साठवणूकीबाबतचे कोणतेही परवाने किंवा आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्याने याबाबत अधिक चौकशी होणे आवश्यक असल्याने अधिकाऱ्यांनी सदर गोदामामध्ये आढळून आलेल्या कडधान्याचा संपूर्ण साठा पंचांसमक्ष जागीच सिलबंद करुन उपस्थित इसम दिपक शिवाजी देसाई यांचेकडे सुपूर्दनाम्याद्वारे ताब्यात देण्यात येवून सदरचा साठा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याच्या सुचना दिल्या.

तपासणीचे दरम्यान मे. एकता इंडस्ट्रीयल युनिट चे व्यवस्थापक दिपक शिवाजी देसाई यांनी गोदामात साठवणूक केलेल्या कडधान्याच्या साठामालकांकडून प्राप्त कागदपत्रांची अवलोकन केले असता, १) मे. रुची वर्ल्डवाईड लिमिटेड यांनी या कार्यालयास सादर केलेल्या माहे जानेवारी २०१२ या महिन्याच्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत घटनास्थळी आढळून आली तथापी घटनास्थळी गोदामामध्ये सदर कंपनीचा प्रत्यक्षात कडधान्याचा साठा आढळून आलेला नाही. २) मे. डी. सी. एम. लिमिटेड यांनी या कार्यालयास सादर केलेल्या माहे जानेवारी २०१२ या महिन्याच्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत घटनास्थळी आढळून आली तथापी विवरणपत्रामधील नमुद गोदामावरुन साठवणूक केलेला साठा व प्रत्यक्षात घटनास्थळी आढळून आलेला साठा यामध्ये तफावत असुन उर्वरीत साठयाचे तपशिल तसेच सदर साठयाचे बिल ऑफ एन्ट्री अथवा तत्संबंधी इतर पुरावादर्शक कागदपत्रे तपासणीचे वेळी उपलब्ध झाले नाही. ३) मे. सत्यनारायण पल्स मिल यांनी आयात केलेल्या तुर या कडधान्याचा साठयाच्या घटनास्थळी आढळून आलेल्या बिल ऑफ लेडींग च्या छायांकित प्रतींचे अवलोकन केले असता सदरचा साठा माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केल्याचे दिसुन येत असुन सदरच्या बिल ऑफ लेडींग वरील नमुद कडधान्याचा साठा व प्रत्यक्षात घटनास्थळी आढळून आलेला साठा यामध्ये बरीच तफावत असुन उर्वरीत साठयाचे तपशिल तसेच सदर साठयाचे बिल ऑफ एन्ट्री अथवा तत्संबंधी इतर पुरावादर्शक कागदपत्रे

तपासणीचे वेळी उपलब्ध झाले नाही. ४) उपरोक्त नमुद गोदामावरील जप्त करण्यात आलेल्या कडधान्याच्या साठयापैकी मे. राजीवा ट्रान्स्पोर्ट, मे. अदानी, मे. कारगिल इंडीया प्रा.लि. व मे. पी ई सी लिमिटेड या चारही कंपन्यांचा साठवणूक केलेला साठा हा आयात केला असल्यास सदर साठयाची बिल ऑफ एन्ट्री अथवा या कार्यालयास सादर करण्यात आलेल्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत तसेच सदरचा साठा आयात केला नसल्यास त्याची खरेदी बिले अथवा इतर तत्संबंधी पुरावादर्शक कागदपत्रे तपासणीचे वेळी उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त नमुद जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा हा आयात केला असल्यास तो आयातदार यांच्या गोदामात साठवणूक केलेला नसुन मे. एकता वेअरहाऊस, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या केतन पटेल यांच्या गोदामात साठवणुक केल्याचे आढळुन आले आहे. मे. एकता इंडस्ट्रीयल युनिट चे मालक केतन पटेल यांचा कडधान्य या जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणुकीचा व्यवसाय असुन त्यांनी त्यांच्या नमुद गोदामावर महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ अन्वये साठवणुकीकरीता परवाना घेतला नसल्याचे तसेच त्याकरीता अर्जही केला नसल्याचे तसेच घटनास्थळी मे. एकता इंडस्ट्रियल युनिट चे मालक व आयातदार कंपनी यांच्या मधील साठवणुकीबाबतचा करारनामाही उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे. ही बाब गंभीर आहे. अशाप्रकारे मे. एकता इंडस्ट्रीयल युनिट, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई चे मालक केतन पटेल यांनी नमुद गोदामावर मोठया प्रमाणावर साठवणुक केलेला विनापरवाना कडधान्याचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने असल्याचे दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहून उपरोक्त नमूद जीवनावश्यक वस्तूंचा साठा घटनास्थळीच जप्त केला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप(अंमल), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचा क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि.०७/०३/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. एकता वेअरहाऊसचे मालक केतन बी. पटेल यांनी उपस्थित राहून त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये तसेच मे. राजीवा एक्सपोर्टस या कंपनीच्या वतीने बी.के. त्यागी, व्यवस्थापक यांनी उपस्थित राहून कंपनीच्या वतीने वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस उर्वरीत साठा मालक उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/०३/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

0005

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. सत्यनारायण पल्स मिल या कंपनीच्या वतीने चिमणलाल शिवजी गाला, मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपीनीच्या वतीने व्ही.टी. सुर्यवंशी, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीच्या वतीने निखिल जे. पुणेवाला व मे. कारगील इंडीया प्रा.लि. या कंपनीच्या वतीने रणविजय सिंग यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने व त्यासोबत आयात संबंधीचे कागदपत्रे सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहीलेले मे. एकता वेअरहाऊसचे मालक केतन बी. पटेल यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या नमूद गोदामावर साठवणूकीची व्यवस्था असून ते आयात केलेल्या कारगोमधील कडधान्याचा साठा त्यांच्या गोदामावर प्रत्येक गोणीमागे दर आकारुन साठवणूकीचा व्यवसाय करतात. तसेच मे. अदानी विलमर लि. यांनी कडधान्यांच्या साठ्याबाबत आयात संबंधीचे आवश्यक कागदपत्रे सादर केली असून उर्वरित साठा मालकांना पुढील सुनावणीमध्ये आयात संबंधीचे आवश्यक कागदपत्रे सादर करण्याच्या सुचना देण्यात आले असल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. राजीवा एक्सपोर्टस या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले बी.के. त्यागी, व्यवस्थापक यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांनी तुर या कडधान्याचा साठा तनझानिया या देशातून बिल ऑफ लेडिंग व कस्टम बिल ऑफ एन्ट्री अन्वये आयात केला असून सदरचा १९२० बाचक्यांमधील ९६ मे. टन तुरचा साठा त्यांनी एकता इंडस्ट्रिज, शेड नं. अे-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, मुंबई येथे साठवणूक केला व त्यापैकी १३४९ बाचक्यांची विक्री करुन उर्वरीत ५७१ बाचके आजमितीस नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगितले. आयात संबंधीचे कागदपत्रे त्यांनी एकता इंडस्ट्रिजचे वेअरहाऊस इन्चार्ज यांना सादर केले आहे. तसेच याबाबत एपीएमसी डिपार्टमेंट यांनाही अवगत केले आहे. तरी त्यांचा ५७१ बाचक्यांमधील आयात करण्यात आलेला तुरचा साठा हा लवकरात लवकर मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. सत्यनारायण पल्स मिल या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले चिमणलाल शिवजी गाला यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांना सुनावणीस उपस्थित राहून वैध कागदपत्रे सादर करण्यासाठी कंपनीने प्राधिकृत केले असून या व्यतिरिक्त काही माहिती हवी असल्यास कंपनीस पत्राद्वारे अथवा दुरध्वनीवरुन संपर्क साधण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. कारगील इंडीया प्रा.लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले रणविजय सिंग यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांना स्थानिक प्रतिनिधी म्हणून कंपनीच्या

वतीने सुनावणीस उपस्थित राहण्यास प्राधिकृत केले असल्याचे सांगून जप्त साठ्याबाबतचे आयात संबंधीचे कागदपत्रे सादर करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २७/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना खात्रीलायक बातमी मिळाली की, शीळ पनवेल मार्गावरील पिंपरी पाडा येथील एकता इंडस्ट्रीयल युनिट या नमुद पत्यावर कडधान्याचा विनापरवाना साठा करुन व्यवसाय केला जात असल्याचे मिळालेल्या बातमीची खातरजमा करण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, हे पथक व पंचासमवेत एकता वेअरहाऊस, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या गोदामास अचानक भेट देऊन तेथील गोदाम क्र. ३, ७ व ८ या गोदामात साठवणूक करण्यात आलेल्या वरील नमूद विविध आस्थापनांचा मोठ्या प्रमाणात कडधान्यांचा साठा हा विनापरवाना अथवा घटनास्थळी साठासंबंधी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने पुढील तपासणीच्या अधीन राहून सदरचा संपूर्ण साठा पंचांसमक्ष जागीच सिलबंद करुन गोदामात उपस्थित इसम दिपक शिवाजी देसाई यांच्याकडे सूर्पूदनाम्याद्वारे ताब्यात देण्यात येऊन सदरचा साठा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याच्या सुचना दिल्या.

मे. अदानी विलमर लि. यांनी या प्रकरणी त्यांचा जप्त करण्यात आलेल्या तुर व उडिद या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र नियमितपणे सादर करुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केलेले असल्यावरुन मे. अदानी विलमर लि. यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने मे. अदानी विलमर लि. यांचा सिल करण्यात आलेला तुर व उडिद या कडधान्यांचा संपूर्ण साठा या कार्यालयाचे आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/जा. १४४ दिनांक १५/०३/२०१२ अन्वये मुक्त करण्यात आला आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे

आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

मे. राजीवा एक्सपोर्टस या कंपनीच्या वतीने बी.के. त्यागी, व्यवस्थापक यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, त्यांनी तुर या कडधान्याचा साठा तनझानिया या देशातून बिल ऑफ लेडिंग व कस्टम बिल ऑफ एन्ट्री अन्वये आयात केला असून सदरचा १९२० बाचक्यांमधील ९६ मे. टन तुरचा साठा त्यांनी एकता इंडस्ट्रिज, शेड नं. अे-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, मुंबई येथे साठवणूक केला व त्यापैकी १३४९ बाचक्यांची विक्री करुन उर्वरीत ५७१ बाचके आजमितीस नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगितले. मे. राजीवा एक्सपोर्टस यांचा गोदाम क्र. ३ मध्ये २८५.५० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा जप्त करण्यात आला आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. राजीवा एक्सपोर्टस यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले नाही. तथापी, मे. राजीवा एक्सपोर्टस यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. [illegible]०७९५०१ दिनांक ०२/११/२०११ रोजी १९२० बाचक्यांमधील ९६०.०० क्विंटल साठा आयात केल्याचे, तसेच त्यापैकी सदरचा १९२० बाचक्यांमधील ९६०.०० क्विंटल तुरच्या साठ्याची मे. एकता वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे नमूद आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना साठा वितरण केल्याचे तपशिल म्हणून मे. राजीवा एक्सपोर्टस यांनी मे. सत्येंद्र अग्रो प्रोडक्टस, गुजरात यांना ३२४ बाचके, मे. सी.बी. पल्सेस मिल, गुजरात यांना ५०० बाचके व मे. गौतम ओव्हरसिस, दिल्ली यांना ५२५ बाचके असे मिळून एकूण १३४९ बाचक्यांची विक्री बिले सादर केली असून उर्वरित शिल्लक असलेला गोदाम क्र. ३ मधील २८५.५० क्विंटल तुरचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. सबब, मे. राजीवा एक्सपोर्टस यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले असल्यावरुन मे. राजीवा एक्सपोर्टस यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसुन येत आहे.

0008 मे. सत्यनारायण पल्स मिल या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले चिमणलाल शिवजी गाला यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, त्यांना सुनावणीस उपस्थित राहून वैध कागदपत्रे सादर करण्यासाठी कंपनीने प्राधिकृत केले असून या व्यतिरिक्त काही माहिती हवी असल्यास कंपनीस पत्राद्वारे अथवा दुरध्वनीवरुन संपर्क साधण्याची विनंती केली. मे. सत्यनारायण पल्स मिल यांचा गोदाम क्र. ३, ७ व ८ मधील अनुक्रमे २०००, २५०० व २२५० क्विंटल असा एकूण ६७५० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा नमूद गोदामांवर जप्त करण्यात आला आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. सत्यनारायण पल्स मिल यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. सत्यनारायण पल्स मिल यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५३८२९३९ दिनांक ०५/१२/२०११ रोजी १०५०० बाचक्यांमधील ५२६०.५० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ५९४०९१५ दिनांक ०७/०२/२०१२ रोजी १०००० बाचक्यांमधील ५०१०.०० क्विंटल साठा असा एकूण २०५०० बाचक्यांमधील १०२७०.५० क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी सदरचा ६७५०.०० क्विंटल तुरच्या साठ्याची मे. एकता वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना साठा वितरण केल्याचे तपशिल म्हणून मे. सत्यनारायण पल्स मिल यांनी विक्री बिले सादर केली नाही. तथापी, सुनावणीमध्ये आयात केलेल्या साठ्यापैकी विक्री केलेला साठा वजा जाता उर्वरित शिल्लक असलेला गोदाम क्र. ३, ७ व ८ मधील एकूण ६७५०.०० क्विंटल तुरचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगितले आहे. सबब, मे. सत्यनारायण पल्स मिल यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले असल्यावरुन मे. सत्यनारायण पल्स मिल यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. कारगील इंडीया प्रा.लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले रणविजय सिंग यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात त्यांना स्थानिक प्रतिनिधी म्हणून कंपनीच्या वतीने सुनावणीस उपस्थित राहण्यास प्राधिकृत केले असल्याचे सांगून जप्त साठ्याबाबतचे आयात संबंधीचे कागदपत्रे सादर केले असल्याचे सांगितले. मे. कारगील इंडीया प्रा.लि. यांचा गोदाम क्र. ८ मधील ३४४ क्विंटल चणा या कडधान्याचा साठा जप्त करण्यात आला आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. तथापी, मे. कारगील इंडीया प्रा.लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला चणा या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबत १८/०२/२०१२ रोजीचा दिनांकित असलेले मासिक विवरणपत्र या कार्यालयास दिनांक २९/०२/२०१२ रोजी म्हणजेच तपासणी झाल्यानंतर सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. कारगील इंडीया प्रा.लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, चणा या

कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ लेडिंग क्र. एमएससीयुबीबी ८४४२३७ दिनांक १३/१२/२०११ रोजी २२५८.०० क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी सदरचा ३४४.०० क्विंटल चणाच्या साठ्याची मे. एकर्ता वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना साठा वितरण केल्याचे तपशिल म्हणून मे. कारगील इंडीया प्रा.लि. यांनी विक्री बिले सादर केली नाही. तथापी, सुनावणीमध्ये आयात केलेल्या साठ्यापैकी विक्री केलेला साठा वजा जाता उर्वरित शिल्लक असलेला गोदाम क्र. ८ मधील एकूण ३४४.०० क्विंटल चणाचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगितले आहे. सबब, मे. कारगील इंडीया प्रा.लि. यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे कमर्शियल इन्व्हाईस, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले असल्यावरुन मे. कारगील इंडीया प्रा.लि. यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसुन येते.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारास त्यांनी आयात केलेल्या साठ्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर करुन अवगत करणे क्रमप्राप्त आहे. तथापि, सुनावणीच्या दरम्यान काही आयातदारांनी त्यांना सदरची प्रक्रीया अवगत नसल्याचे सांगून सद्य:स्थितीत शिल्लक असलेला व यापूंढील काळात आयात करण्यात येणाऱ्या साठ्याबाबत नियमीतपणे मासिक विवरणपत्र सादर करणार असल्याचे सांगून त्यांनी आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच शिल्लक असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. यावरुन आयातदारानी आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती या कार्यालयास सादर न केल्याची चुक मान्य केली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता जप्त साठ्याच्या मालकांनी सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा विविध कडधान्यांचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. राजीवा एक्सपोर्टस या कंपनीचा सिल करण्यात आलेला गोदाम क्र ३ मधील २८५.५० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा, मे. सत्यनारायण पल्स मिल या कंपनीचा सिल करण्यात आलेला गोदाम क्र. ३, ७ व ८ मधील अनुक्रमे २०००, २५०० व २२५० क्विंटल असा एकूण ६७५०.०० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा व मे. कारगील इंडीया प्रा.लि. या कंपनीचा सिल करण्यात आलेला गोदाम क्र. ८ मधील ३४४.०० क्विंटल चणा या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. राजीवा एक्सपोर्टस या कंपनीचा गोदाम क्र ३ मधील २८५.५० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. सत्यनारायण पल्स मिल या कंपनीचा गोदाम क्र. ३, ७ व ८ मधील अनुक्रमे २०००, २५०० व २२५० क्विंटल असा एकूण ६७५०.०० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. कारगील इंडीया प्रा.लि. या कंपनीचा गोदाम क्र. ८ मधील ३४४.०० क्विंटल चणा या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना परत करण्यात यावा.

४) केंद्र शासनाच्या अधिसुचनाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांनुसार तसेच दिनांक २० मे, २००८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार आयातदारांनी आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. एकता वेअरहाऊसचे मालक केतन पटेल
२) मे. राजीवा ट्रान्स्पोर्ट चे मालक
३) मे. सत्यनारायण पल्स मिल चे मालक
४) मे. कारगील इंडीया प्रा.लि. चे संचालक
(उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
- 224 -
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.